<u>सं. फौ. ख. क्र. ३०/२०१५</u> निशाणी १००

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. ९ यांचा जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – राम मधुकर आंबेकर

वय – ५५ वर्षे, व्यवसाय – पो.हे.कॉ. पोलीस मुख्यालय, अकोला

पत्ता – गीता नगर, अकोला, ता. जि. अकोला.

**<u>सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर.लोखंडे यांचे मार्फत सरतपास सुरुः</u>**

१. दि. २४.११.२०१४ रोजी मी पोलीस स्टेशन, उरळ येथे पो. कॉ. या पदावर कार्यरत होतो. तेथे कार्यरत असतांना ठाणेदार श्री.पी.के.काटकर यांनी ग्राम कवठा शिवारातील बॅरेजमध्ये अर्धवट जमीनीत गाडलेल्या लोखंडी टाकीत डिझेल टँकर मधुन डिझेल उतरवित आहे अशी माहिती दिली. सदर प्रकरणात उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कायदेशीर कारवाई करावयाची आहे म्हणुन तुम्ही सोबत चला असे श्री. काटकर यांनी सांगितले. म्हणुन मी त्यांच्या सोबत बातमीच्या ठिकाणी गेलो. त्याठिकाणी टँकर क्र. एम.एच. २८ बी. ७३४५ या मधील चौथ्या कप्प्यातुन एक पाईप जमीनीत अर्धवट गाडलेल्या टाकीत लावलेला होता. तसेच एक मोटरपंप सुध्दा लावलेला होता. पोलीस उपविभागीय अधिकारी यांनी टँकर चालक जयवंत माने यांना सदर प्रकरणाबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, त्यांनी क्लिनर राज मोहम्म्द सोबत गायगाव ऑईल डेपोमधुन ६००० लिटर पेट्रोल आणि ६ हजार लिटर डिझेल असे भरुन निंबा फाटा येथील अग्रवाल यांच्या पेट्रोलपंपवर उतरविण्यासाठी आणले. त्यांनी अग्रवाल पेट्रोलपंपवर ६ हजार लिटर पेट्रोल व ३ हजार लिटर डिझेल उतरविले. पेट्रोलपंपचे मॅनेजर कैलास खट्टी यांनी उर्वरित ३ हजार लिटर डिझेल कवठा बॅरेज येथील लोखंडी टाकीत उतरविण्यास सांगितले. म्हणुन प्रोजेक्ट इंजिनिअर मंजुनाथ पट्टनशेट्टी, चालक जयवंत माने आणि क्लिनर राज मोहम्म्द असे कवठा बॅरेज येथे आले. जमीनीत गाडलेल्या टाकीत अंदाजे १ हजार लिटर डिझेल उतरविले असेल त्यावेळी पोलीस त्या ठिकाणी आले आणि त्यांनी डिझेल उतरविण्याचे काम थांबविले.

२.	पोलीसांनी येवुन टँकरमधील आणि लोखंडी टाकीमधील डिझेल प्रत्येकी ७५० मि.ली. काचेच्या बाटलीत प्रत्येकी ३–३ नमुने काढले. त्यावर कागदी लेबल लावुन तपास अधिकारी, पंच, आरोपी यांच्या सहया करुन सिल केले. त्यानंतर टँकर व लोखंडी मधील डिझेल, टँकर व इतर साहित्य जप्त करुन पोलीस स्टाफ, पंच आणि आरोपी असे सर्व उरळ पोलीस स्टेशनला परत आलो. सदर कारवाईबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. गावडे यांनी फिर्याद दिली होती. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीसांनी माझे बयांन नोंदविले होते. आरोपींना पाहिल्यास मी ओळखु शकेल. आजरोजी दोन आरोपी न्यायालयात हजर असुन दोन गैरहजर आहेत. (आरोपी क्र. २ व ३ यांचा गैरहजेरीचा अर्ज मंजुर करण्यात आला.)

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपी क्र. १ ते ३ तर्फे विधीज्ञ श्री. एन.एम. अग्रवाल गैरहजर, आरोपी क्र. १ हजर. आरोपी क्र. १ यास उलटतपास घेणेबाबत विचारणा केली असता, आरोपी क्र. १ ने असमर्थता दर्शविली. म्हणुन आरोपी क्र. १ ते ३ चा उलटतपास नाही.</u>**

**<u>उलटतपास आरोपी क्र. ४ तर्फे विधीज्ञ श्री. एस.टी.इंगळे यांचे मार्फत</u>**

३.	हे म्हणणे खरे आहे की, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. गावडे आणि ठाणेदार श्री. काटकर यांच्याकडे डिझेल मोजण्याचे कोणतेही यंत्र नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी किंवा श्री. काटकर यांनी नमुन्यासाठी काचेच्या बाटल्या सोबत नेल्या नव्हत्या. डिझेल मोजण्याचे यंत्र नव्हते म्हणुन श्री. गावडे यांनी अंदाजे डिझेलचा आकडा लिहिलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी आरोपींविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.11.24 11:13:51 +0530

बाळापूर.
दि. २१/११/२०२५

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.